भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र.४२७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०८/०७/२०१७

१) संगनमत करुन शेतीच्या जुण्या वादावरुन लोखंडी रॉडने व काठीने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक ०७/०७/२०१७ चे १७.०० वा. दरम्यान यातील चारही आरोपीतांनी संगनमत करुन शेतीच्या जुण्या वादावरुन शेतीवर असलेला फिर्यादी व त्याचे सोबत असणारा त्याचा पुतण्या प्रमोद वसंता लिचडे वय ३८ वर्ष, याला लोखंडी रॉडने, काठीने डावे डोळयाचे वर व फिर्यादीचे डोक्यावर, पाठीवर, हातापायावर मारपीट करुन जखमी केल्याने फिर्यादी अशोक मोतीराम लिचडे वय ५३ वर्ष, रा. कोथुर्णा ह. म. सुभाष वार्ड वरठी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोस्टे. वरठी येथे कलम ३२४,३४ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोंदे पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

२) विषारी औषध प्रशन केल्याने तरुणाचा मृत्यु . :–

दिनांक ०७/०७/२०१७ चे ०८.०० वा. दर. यातील मृतक विपलव बबनराव भिवगडे वय २८ वर्ष, रा. विनोबा नगर तुमसर हा दारुचे नशेत विषारी औषध प्राशन करुन मृत अवस्थेत पडला असल्याने फिर्यादी पुरुषोत्तम विश्वेश्वर भिवगडे वय ५९ वे, रा. गांधीनगर तुमसर यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे तुमसर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. सोनपीतरे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

३) विष प्रशन केल्याने औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :–

दिनांक ०७/०७/२०१७ चे ०७.३० वा. दर. यातील मृतक प्रभु मारोती दोनोडे वय ६० वर्ष, रा. मासळ याने विष प्राशन केल्याने त्यास औषधोपचारा करीता सामान्य रुग्णालय भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पोस्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पोस्टे ला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. ढोक यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. ऊईके पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

३) वाहन सार्वजनीक ठिकाणी आमरोडवर थांबवुन येणाऱ्या जाणाऱ्या लोकांच्या जिवीतास धोका निर्माण केल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक ०७/०७/२०१७ चे १७.०० वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील टाटा मॅजीक गाडी ही आमरोडवर सार्वजनीक ठिकाणी येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांना व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या ठिकाणी उभी करतांनी मिळुन आल्याने पोस्टे. पवनी येथे कलम २८३ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. कोडवते पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

४) वाहन सार्वजनीक ठिकाणी आमरोडवर थांबवुन येणाऱ्या जाणाऱ्या लोकांच्या जिवीतास धोका निर्माण केल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक ०७/०७/२०१७ चे १७.३० वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील ऑटो ही आमरोडवर सार्वजनीक ठिकाणी येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांना व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या ठिकाणी उभी करतांनी मिळुन आल्याने पोस्टे. आंधळगाव येथे कलम २८३ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. इंगळे पो.स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

**<u>६) दारूडया वाहन चालकांवर कारवाई. :—</u>**

दिनांक ०७/०७/२०१७ रोजी १७.३० वा. दरम्यान यातील आरोपी ताब्यातील मोटार सायकल हे दारू पीवुन दारूच्या नशेत कारधा येथे चालवितांना मिळुन आला, त्याचे ब्रीथ अल्कोहोल ॲनालायझर मशिन व्दारे चेक केले असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने पास्टे गोबरवाही येथे कलम १८५(अ) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. तपास पोना. इंगोले पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**<u>७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—</u>**

दिनांक ०७/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण २१३ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०८ तीन सिटर वाहनांवरती २४ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १८१ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म.रा.)

**सपोनी. बोरकुटे**
**पोलीस नियत्रंण कक्ष** अधिकारी
**भंडारा**
**दुरध्वनी.९६५७४०७१७३**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.